# प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**
**फोन नं. ०२०-२६६८५०००**

जा.क्र./पोउआ/वाह/१२७५ /२०२५ पुणे दिनांक – १४/०२/२०२५

बाणेर व चतुःश्रृंगी वाहतूक विभागांतर्गत दि. १६/०२/२०२५ रोजी लोकमत वृत्तपत्रातर्फे महामॅरेथॉनचे आयोजन करण्यात आलेले आहे. नमूद मॅरेथॉन ही छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकूल, म्हाळुंगे - राधा चौक - बालेवाडी हायस्ट्रिट - ममता चौक - लक्ष्मी माता मंदिर चौक - गणेश दत्त मंदिर चौक - ज्यूपीटर हॉस्पिटल चौक - अॅलोमा काऊंटी रोड - औंध बाणेर लिंक रोड - मेडीपॉईंट चौक - नागरस रोड भाले चौक वेस्टएन्ड मॉल रोड - परिहार चौक - ब्रेमेन चौक - राजभवन व पुन्हा त्याच मार्गाने छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकूल, म्हाळुंगे या मार्गे संपन्न होणार असल्याने वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, बाणेर व चतुःश्रृंगी वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**<u>बाणेर व चतुःश्रृंगी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत दि. १६/०२/२०२५ रोजी पहाटे ०४.०० वा. ते १०.०० वा. चे दरम्यान खालील प्रमाणे वाहतुकीत बदल करण्यात येत आहेत.</u>**

१. राधा चौकाकडुन सायकर चौकाकडे जाणारी वाहतुक ही सकाळी ०४.०० वा ते ०९.०० वाजणेचे दरम्यान सर्व प्रकारच्या वाहतुकीकरिता बंद करण्यात येत आहे.
२. सायकर चौकाकडुन राधा चौकाकडे जाणारा मार्ग दुतर्फा वाहतुक बंद करण्यात येत आहे.
३. सायकर चौकाकडुन ममता चौकाकडे जाणारी वाहतुक ही सकाळी ०४.०० वा ते ०९.०० वाजणेचे दरम्यान वाहतुकी करिता बंद करण्यात येत आहे.
४. ममता चौकाकडुन सायकर चौकाकडे जाणारा मार्ग दुतर्फा वाहतुक करण्यात येणार आहे.
५. सायकर चौक ते ममता चौक, दसरा चौक ते लक्ष्मी माता मंदिर, गणेश मंदिर चौक, ज्युपीटर हॉस्पिटल चौक ताम्हाणे चौक, नागरस रोड - भाले चौक - वेस्टएन्ड मॉल रोड चौक - परिहार चौक ब्रेमेन चौक पर्यंत वाहतुक ही रस्त्याचे उजव्या बाजुने दुतर्फा चालु राहील व मॅरेथॉन करिता रस्त्याची डावी बाजू वापरण्यात येईल.
६. ब्रेमेन चौक ते बाल कल्याण संस्था पर्यंत रस्त्याच्या उजवे बाजुने फुटपाथ लगत रस्त्याने जाणार असुन पुन्हा त्याच मार्गाने बालेवाडी क्रिडा संकुल येथे परत जाणार आहेत.
७. राजभवन ते ऋषी मल्होत्रा चौक मार्ग मॅरेथॉन दरम्यान वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात येत आहे.
८. वरील नमुद मॅरेथॉन मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना पहाटे ०४.०० वा. ते १०.०० वाजणेचे दरम्यान नो पार्किंग नो हॉल्टींग करण्यात येत आहे.

**(नागरीकांनी मॅरेथॉन मार्गा ऐवजी पर्यायी मार्गाचा वापर करावा तसेच वाहतुक कर्मचारी / स्वयंसेवक यांना सहकार्य करावे.)**

पोलीस उप-आयुक्त, वाहतुक * पुणे शहर *

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर